अंमली पदार्थ विरोधी कक्ष, वरळी युनिट
गुन्हे शाखा, बृहन्मुंबई

‘‘चरस ’’ या अंमली पदार्थासह दोन इसमास गजाआड केलेबाबत.

कक्ष	:-	अंमली पदार्थ विरोधी कक्ष, वरळी युनिट, गु.शा., गु.अ.वि., मुंबई.
गु.र.क्र. व कलम	:-	**अं.प.वि.क. गु.र.क्र. १०५/२०२६** (टिळकनगर पोलीस ठाणे गु.र.क्र. ६६७/२०२६) कलम- ८ (क) सह २०(क), २९ एन. डी. पी. एस. ॲक्ट- १९८५
गुन्हा घडला दिनांक	:-	दिनांक २४/११/२०२६ रोजी २२.४५ वाजता ते दिनांक २५/११/२०२६ रोजी ०१.४० वाजताच्या दरम्यान
गुन्हा दाखल दिनांक	:-	दिनांक २५/११/२०२६ रोजी
जप्त मुद्देमाल व मुल्य	:-	**किं.अं.रू. १२,२०,००,०००/- मुल्याचा १२ किलो २०० ग्रॅम वजनाचा ‘चरस’ हा अंमली पदार्थ**

दिनांक २४/११/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्ष, वरळी युनिटचे पथक मुंबई शहरातील अंमली पदार्थ खरेदी-विक्री करणारे, पुरवठा, साठा करणारे इसमांचा शोध घेत असताना लोकमान्य टिळक टर्मिनल्स, मुंबई या ठिकाणी दोन इसमांच्या हालचाली संशयास्पद आढळुन आल्याने त्यांना अटकाव करून त्यांचेकडुन किं.अं.रू. १२,२०,००,०००/- मुल्याचा १२ किलो २०० ग्रॅम वजनाचा ‘चरस’ हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. त्यानंतर नमुद दोन्ही आरोपींविरुध्द गुन्हा नोंद करून आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपीनी अपर लिंकबाबत माहिती दिल्यावरून पोलीस पथक उत्तर प्रदेश येथे रवाना करण्यात आलेले आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री. अनिल कुंभारे, पोलीस सह आयुक्त (गुन्हे), मा. श्री. कृष्णकांत उपाध्याय, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मा. श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई, व श्री. सचिन पाटील, पोलीस निरीक्षक (अति. कार्यभार) सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई, अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, वरळी युनिटचे प्रभारी पो.नि. संतोष साळुंखे यांचे नेतृत्वाखाली, पो.नि. दिगंबर पाटील, पो.उ.नि. मुकुंद जाधव व पथक यांनी केली आहे.

----------//----------